महाराष्ट्र शासन

# जिल्हा निवड समिती, हिंगोली
# थेट मुलाखती

जिल्हा निवड समिती, हिंगोली अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत आरोग्य संस्थेमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट गट-अ या पदावर कंत्राटी पद्धतीने एम.बी.बी.एस. व विशेषज्ञ ( पदव्युत्तर पदवी/पदविका ) यांची रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने थेट मुलाखती द्वारे भरण्यासाठी जाहिरात २०२३-२४

| अ.क्र. | पदाचे नांव ( कार्यक्रम ) | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | एकत्र मानधन प्रति माह |
|---|---|---|---|---|
| ०१. | वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर कंत्राटी एम.बी.बी.एस. | २२ | एम.बी.बी.एस. | ७५०००/- प्रति माह |
| | | | एम.बी.बी.एस. पदव्युत्तर पदवी /पदविका | ८५०००/- प्रति माह |
| २ | वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर कंत्राटी .बी.ए.एम.एस. | | बी.ए.एम.एस. पदव्युत्तर पदवी /पदविका | ४००००/ प्रति माह |

अटी व शर्ती :-

सदर रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने उमेदवारांच्या कागदपत्राची पडताळणी दिनांक ०१/०१/२०२४ व ०२/०१/२०२४ रोजी सकाळी ११.०० जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय हिंगोली येथे ठेवण्यात आल्या आहेत.कागदपत्र पडताळणी समीती मार्फत करण्यात येईल व दि.०५.०१.२०२४ रोजी पात्र उमेदवारांची थेट मुलाखत मा.जिल्हधिकारी हिंगोली तथा अध्यक्ष निवड समिती,हिंगोली व सदस्य यांच्या मार्फत घेण्यात येईल.

१. सदरील रिक्त पदे नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत प्राधान्याने एम.बी.बी.एस. पदव्युत्तर पदवी /पदविका धारकामधुन भरण्यात येईल, तदनंतर एम.बी.बी.एस. उमेदवारामधुन भरण्यात येईल. तदनंतर पदे रिक्त राहत असतीलतरच बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिका-यामधुन भरण्याच्या शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२. तात्पुरती नियुक्ती दिलेल्या कंत्राटी वैद्यकीय अधिकारी असल्याने त्यांना शासनाने ठरवुन दिलेल्या नियमा प्रमाणे दिनांक ०५/०१/२०२२ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत नियमा प्रमाणे शिथिलक्षम.

३. मुलाखतीस उपस्थित राहत असतांना सोबत विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी व तत्सम पदाची शैक्षणिक अर्हते बाबत नोंदणी प्रमाण पत्र/ तत्सम कौन्सील चे रजिस्टेशन प्रमाण पत्र दाखविणे बंधनकारक राहिल. त्या शिवाय उमेदवार पात्र होणार नाही.

४. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकीय अधिका-यांसारखे म.ना.से. निवृत्ती वेतन, म.ना. से. रजा, सेवा जेष्ठता नियम लागू राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना वार्षिक वेतनवाढ, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

५. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होऊन अहवाल सर्व संबंधितांना सादर करावा.

Scanned with CamScanner

६. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्याचा धारणाधिकार असणार नाही.

७. केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्या नियमित सेवेस जोडुन दिली जाणार नाही.

८. केवळ निव्वळ तात्पुरती व कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची म.ना.से. ( निवृत्ती वेतन ) नियम १९८२ मधील नुसार अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही.

९. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असतांना मुख्यालयास न राहिल्याचे निदर्शनास आल्यास अथवा कामावर गैरहजर असल्यास त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

१०. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणूक ) नियम १९७९ मधील तरतूदी लागु होतील.

११. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

१२. सदर आरोग्य संस्थेत नियमित वैद्यकीय अधिकारी यांची पदस्थापना झाल्यास सदर कंत्राटी पदावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१३. सदर कंत्राटी पदावरील नियुक्ती ही केवळ ११ महिन्याच्या कालावधीसाठी असून यापूढे आपणास पुनर्नियुक्तीच्या पुढील कालावधीसाठी हक्क राहणार नाही.

१४. जाहिरातीत नमूद पदांची संख्या व मानधन कमी अथवा जास्त होऊ शकतात तसेच निवड प्रक्रीया संबंधी कोणताही निर्णय घेण्याचे सर्व अधिकार निवड समितीने राखुन ठेवण्यात आलेले आहेत. निवड झालेल्या कोणत्याही उमेदवारांची नियुक्ती सेवा कालावधी रद्द करण्याचा अथवा चालु ठेवण्याचा अंतिम अधिकार निवड समिती अध्यक्ष यांचे कडे राखुन ठेवला आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक तथा सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती,हिंगोली

## जिल्हा निवड समिती,हिंगोली
## आरोग्य विभाग, हिंगोली
### कंत्राटी /तदर्थ वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. पदासाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नांव ( मराठी मध्ये) | |
| | इंग्रजी मध्ये (कॅपीटल ) | |
| २. | वडीलांचे नांव / पतीचे नांव ( मराठी मध्ये) | |
| | इंग्रजी मध्ये (कॅपीटल) | |
| ३. | जन्म तारीख व जाहिरातीच्या दिवशीचे वय | / / <br> वर्ष महिने दिवस |
| ४. | लिंग स्त्री / पुरुष | |
| ५. | मोबाईल नंबर ( DND ॲक्टीव नसावा) | |
| ६. | संपूर्ण पत्ता | |
| ७. | जाहिरातीनुसार मुळ शैक्षणीक पात्रता | |
| ८. | MBBS मेजर व मायनर गुण | |
| ९. | इतर शैक्षणीक अर्हता | |
| १०. | अनुभव असल्यास (शासकीय/ NHM) | |
| ११. | नोंदणी प्रमाण पत्र /कौन्सील प्रमाण पत्र क्र. व <br> दिनांक अंतीम नोंदणी प्रमाण पत्र मुदतीत असावे. | |

वर दिलेली सर्व माहिती खरी असून या मध्ये कांही खोटे आढळुन आल्यास होणा-या कार्यवाहीस मी स्वत: जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

Scanned with CamScanner